स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.

संशोधन आराखडा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे विद्याशाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयातील पीएच. डी. पदवीकरिता सादर करण्यात येणारा शोध प्रबंधाचा आराखडा

<u>संशोधन विषय</u>

‘‘ डॉ. नरेंद्र दाभोलकरांचे सामाजिक राजकारण : एक राजकीय अभ्यास ’’

संशोधक

धुळेकर नागनाथ यादवराव

संशोधन केंद्र

पीपल्स कॉलेज, नांदेड.

मार्गदर्शक

प्रा. डॉ. आदिनाथ इंगोले

विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक

राज्यशास्त्र विभाग,

श्री.गुरु बुध्दिस्वामी महाविद्यालय, पूर्णा (जं.) जि. परभणी – ४३१५११

ऑगस्ट २०१६

‘‘डॉ. नरेंद्र दाभोलकरांचे सामाजिक राजकारण : एक राजकीय अभ्यास’’

प्रस्तावना (Introduction) :

साधारणपणे २० शतकातील शेवटचे दशक, २१ शतकातील पहिले दशक या दोन्ही शतकाच्या दोन दशक वर्षात डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी अंधश्रध्दा निर्मूलनाचे महान कार्य केलेले आहे. एक महान समाजसुधारक म्हणून डॉ. नरेंद्र दाभोलकरांची भारतीय इतिहासात नोंद करावी लागेल असे महान कार्य यांनी केले आहे. जातीविहीन, वर्गविहीन व स्त्रीदाश्यविहीन शोषनमुक्त, अंधश्रध्दामुक्त आणि समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, न्याय, धर्मनिरपेक्षता लोकशाही आणि समाजवाद या मुल्यांची वास्तवात प्रस्थापना व प्रबुध्द भारत, विज्ञाननिष्ठ भारत, मानवतावादी भारत निर्माण करणे या महान ध्येयासाठी डॉ. नरेंद्र दाभोलकरांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. याचं ध्येयवादाच्या प्राप्तीसाठी एक क्रांतिकारक योध्दा म्हणून त्यांनी बलिदान केले, ते आपल्या क्रांतिकारक ध्येयवादाच्या संघर्षात शहीद झाले. डॉ. नरेंद्र दाभोलकरांसारखा तत्त्वनिष्ठ, ध्येयवादी, त्यागी महापुरूष त्यांच्या समकालात होऊन गेलेले तेच एकमेव प्रबोधनाचे महानायक ठरतात असे म्हटले तर गैर ठरणार नाही.

बहुसंख्य राजकीय अभ्यासकांच्या मतानुसार प्रत्येक व्यक्ती ही व्यापक अर्थाने राजकारणीच असते. प्रत्येक व्यक्तीच्या कोणत्याही प्रकारच्या सामाजिक वर्तनामध्ये त्या व्यक्तीचे सामाजिक राजकारण असते. काही व्यक्ती प्रत्यक्ष राजकारण करतात तर काही व्यक्ती अप्रत्यक्ष राजकारण म्हणजे निवडणुकांचे राजकारण केलेले दिसून येत नाही. परंतु त्यांनी अंधश्रध्दा निर्मूलन चळवळीच्या माध्यमातून अंधश्रध्देला बळी पडणाऱ्या बहुसंख्य जनतेला अंधश्रध्दामुक्त करण्याचे, त्यांना जाणीव जागृत करण्याचे आणि त्यांचे देवाच्या व धर्माच्या नावाने शोषण करणाऱ्या बुवा, बाबा विरूध्द, पुरोहिताविरूध्द, शासक, शोषक वर्गाविरूध्द त्यांना संघर्षास सिध्द करण्याचा प्रयत्न केला. डॉ. दाभोलकरांचे हे कार्य आधुनिक आदर्श मुल्यांच्या प्रस्थापनेच्या दृष्टीने आवश्यक असले तरी त्यामुळे ज्या लोकांचे हितसंबंध धोक्यात येत होते त्या लोकांना डॉ. नरेंद्र दाभोलकर आपल्या हितसंबंधाविरूध्द आहेत असे वाटत होते. अपरिहार्यपणे अंधश्रध्दा निर्मूलन चळवळीच्या माध्यमातून दाभोलकरांनी उभारलेला लढा हा व्यापक जनसमुहाच्या हिताचा असला तरी त्यांचा लढा ज्या लोकांच्या

हितसंबंधाविरूध्द होता त्यांनी सातत्याने दाभोलकरांच्या कार्याला विरोध केलेला दिसून येतो. जेथे परस्परविरोधी हितसंबंध येतात तेथे परस्परविरोधी हितसंबंधी यात हितसंबंधाचा संघर्ष निर्माण होतो. आणि जेंव्हा परस्परविरोधी हितसंबंध निर्माण होतात तेंव्हा परस्परविरोधी हितसंबंधाचे राजकारण उदयाला येत असते. त्यामुळे डॉ. नरेंद्र दाभोलकरांचे अंधश्रध्दा निर्मूलनाचे कार्य सामान्यपणे समाजकारण असले तरी व्यापक अर्थाने ते त्यांचे विशिष्ट हितसंबंधाचे व विशिष्ट हितसंबंधाविरूध्दचे राजकारण होते असे म्हणता येईल. या अर्थाने डॉ. नरेंद्र दाभोलकरांचे सामाजिक कार्य हे त्यांचे एक प्रकारचे राजकारणही आहे असे म्हणता येईल. या अर्थाने त्यांचे समाजकारण एक राजकारण राहिले आहे.

डॉ. नरेंद्र दाभोलकर हे गांधीवादाने, आंबेडकरवादाने व मार्क्सवादाने आणि प्रामुख्याने लोकशाही समाजवादी विचाराने प्रभावित असलेले सामाजिक कार्यकर्ते राहिले आहेत. उपरोक्त विचारसरणीमध्ये प्रामुख्याने सामाजिक राजकारण असल्याचे दिसून येते. प्रामुख्याने उपरोक्त विचारसरणी या राजकीय विचारसरणी म्हणून ओळखल्या जातात. या विचारसरणीच्या माध्यमातून व्यक्त होणारा ध्येयवाद प्रस्थापित करण्यासाठीच डॉ. नरेंद्र दाभोलकरांनी अंधश्रध्दा निर्मूलनाचे कार्य केलेले आहे. या अर्थाने हे त्यांचे समाजकारण एक चांगल्या अर्थाने राजकारण होते असे ठामपणे म्हणता येईल.

महाराष्ट्र शासनाने अंधश्रध्दा निर्मूलनासाठी कायदा करावा त्यासाठी त्यांनी आपल्या **''महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती'' द्वारे** स्वत:च्या देखरेखीखाली या कायदयाचा मसुदा तयार केला होता. सर्व प्रथम <u>२००३</u> मध्ये महाराष्ट्राच्या मंत्रीमंडाळामध्ये हा मसुदा चर्चेसाठी ठेवण्यात आला. त्यानंतर <u>२००५</u> मध्ये विधीमंडळापुढे ठेवला असता खुद्द सत्ताधारी पक्षानेच त्याला कडाडून विरोध केला. त्यामुळे अंधश्रध्दा निर्मूलन बिल केवळ जादूटोणा विरोधी बिल बनले होते. डॉ. नरेंद्र दाभोलकर एक संयमी अन नम्र माणूस होते त्यांच्या अशा विचारानेच समाज परिवर्तनाची ज्योत पेटविता येऊ शकते अशी त्यांची श्रध्दा होती. आपल्यासमोर अगदी ठोस उद्दिष्टे ठेवून सर्वसामान्य समाजाला अंधश्रेध्देच्या व्याधीपासून मुक्त करून वैज्ञानिक विचाराकडे वळते करणे हाच त्यांचा ध्यास होता.

डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी <u>१९८०</u> पासून खऱ्या अर्थाने अंधश्रध्दा निर्मूलनाच्या सामाजिक कार्याला सुरूवात केल्यापासून सातत्याने अनेक विविध समस्यांना तोंड दिले पण कधी त्यांनी त्यासाठी पोलीस संरक्षण स्वीकारले नाही. ''टाईम्स ऑफ इंडिया'' मध्ये प्रकाशित त्यांचे या बाबतीत स्पष्टीकरण होते, ''जर मला माझ्या देशात माझ्याच लोकांकडून पोलीस संरक्षण घ्यावे लागलं तर मला

वाटेल की, माझ्यातच काही दोष असावा. मी भारतीय राज्यघटनेच्या चौकटीतच राहून आपले संघर्ष करतो आहे. जे कोणाच्या ही विरोधात नाही किंबहूना ते सर्वांच्याच हिताचे आहे.'' या त्यांच्या विचारातूनचं आपल्याला डॉ. नरेंद्र दाभोलकरांचे समाजकारण व राजकारण सनदशीर पध्दतीचे होते हे दिसून येते.

डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्यावर केवळ समाजवादाचाचं वैचारिक प्रभाव होता असे नव्हे तर जातविरोधी चळवळीचा ही प्रभाव होता असे स्पष्ट होते. त्यांचा सामाजिक सुधारणेचा परीघ व्यापक होता म्हणून जात आणि समता हा प्रश्न उचलणाऱ्या महात्मा ज्योतीराव फुले यांचे खरेखुरे ते अनुयायी होते असे म्हणावे लागेल. डॉ. नरेंद्र दाभोलकर विवेकवादी, सामाजिक न्यायाचा मुद्दा अग्रस्थानी मांडणारे धर्मनिरपेक्षतावादी होते. लोकशाही सहअस्तीत्वाची विवेकी व्यक्ती घडवणे व विवेकी समाजव्यवस्थेकडे वाटचाल करणे हेच अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे मुख्य ध्येय राहिले आहे. विवेकवादी व्यक्ती, नितिमान समाज निर्मितीला ''अंनिस'' सर्वाधिक महत्व देते.

महाराष्ट्राला पुरोगामी विचाराची मोठी परंपरा आहे. डॉ. नरेंद्र दाभोलकर याचं परंपरेचे पाईक होते. अंधश्रध्देला विरोध करणारी आणि त्यासाठी कार्य करणारी तरूणांची एक क्रियाशील फळी त्यांनी उभी केली. अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे कार्य तळागळात, खेडयापाडयापर्यंत पोहचविण्याचे कार्य डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी केले. त्यासाठी विविध पुस्तके लिहिले. ते उत्तम वकृत्व असलेले प्रभावी वक्ते होते. अंधश्रध्दा निर्मूलन चळवळ आणि जादूटोणा विरोधी कायदा हे देव व धर्माच्या विरोधात नसून, देव व धर्माच्या नावाने होणारा अन्याय आणि शोषणाच्या विरोधात आहे, हे विचार ते उदाहरणांसहित पटवून देत. डॉ. नरेंद्र दाभोलकरांचे एकूण समाजकारण हेच त्यांचे व्यापक अर्थाने, चांगल्या अर्थाने राजकारण होते. या अर्थाने त्यांचे कार्य, त्यांचे तत्त्व आणि व्यवहार म्हणजे एक प्रकारचे आदर्श ''सामाजिक राजकारण'' होते असे म्हणता येईल.

संशोधन विषयाची निवड (Selection of Subject) :

डॉ. नरेंद्र दाभोलकर हे एक स्वातंत्र्योत्तर भारतातील एक महान समाजसुधारक होत. समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, न्याय, धर्मनिरपेक्षता, लोकाशाही समाजवाद या मानवी मुल्यांवर श्रध्दा ठेवून या मुल्याच्या वास्तविक प्रस्थापनेसाठी मूलभूत गरज म्हणून त्यांनी महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीची स्थापना केली. त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील एक भक्कम चळवळ म्हणून ''अंनिस'' नावारूपाला आली. डॉ. नरेंद्र दाभोलकरांनी आणि त्यांच्या कार्यकत्यांनी मिळून महाराष्ट्रात अंधश्रध्दा निर्मूलनाचे फार मोठे कार्य केलेले आहे. डॉ. दाभोलकरांच्या

अंनिसच्या कार्यामुळे समाजातील अज्ञान अंधश्रध्दा दूर होऊ लागल्या परिणामी समाजातील अज्ञान अंधश्रध्दाचा कायदा होऊन बुवाबाजी करणारे, भोंदूगिरी करणारे, बुवाबाबा, मांत्रिक, तांत्रिक आणि त्यांना अशा भोंदूगिरीत राजकीय स्वार्थासाठी सहकार्य करणारे शासनातील, प्रशासनातील लोक तसेच समाजातील अज्ञान, अंधश्रध्दा व धर्मश्रध्देचा फायदा घेऊन त्या आधारे राजकारण करणाऱ्या पक्ष संघटना यांचे हितसंबंध धोक्यात येऊ लागले. लोक शहाणे होणे अशा भोंदू लोकांना परवडत नसते, म्हणून या लोकांतून वेगवेगळया पध्दतीने डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या चळवळीला या लोकांकडून विरोध होत आलेला आहे.

दरम्यान डॉ. दाभोलकरांनी कायदेतज्ञांच्या सहकार्याने अंधश्रध्दा निर्मूलनविषयक कायद्याचा मसुदा तयार केला होता. तो शासनाकडे देवून त्या पध्दतीचा अंधश्रध्दा निर्मूलनाचा कायदा करावा यासाठी दाभोलकरांनी व त्यांच्या संघटनेनी आग्रही भूमिका घेतली होती. शासनाने या कायदयाचे गांभीर्य लक्षात घेऊन तो कायदा करण्याविषयी अनुकूलता दाखविली होती. परंतु या कायदयाला विरोध असणाऱ्या प्रतिगामी शक्तीच्या दबावात वेळोवेळी शासनाने कायदा करण्याविषयी चालढकल करून ते टाळण्याचाचं प्रयत्न केला. या कायद्याला विरोध असणाऱ्या प्रतिगामी शक्ती ही आक्रमक झाल्या होत्या. या सर्व संघर्षात दाभोलकरांचे व त्यांच्या संघटनेची भूमिका भारतीय संविधानाच्या चौकटीत अत्यंत योग्य असल्यामुळे त्याला पूर्णपणे नकार देणे राज्यकर्त्यांना शक्य होत नव्हते. शेवटी सर्व सहमतीने **''जादूटोणाविरोधी कायदा''** च्या स्वरूपात प्रस्तावाला सहमती प्राप्त झाली. आता हा कायदा होणार या भितीने प्रतिगामी, धार्मिक, दुराभिमानी, सनातनी लोक तसेच बुवाबाबा भोंदूगिरी करणारे बुवाबाजी मांत्रिक तांत्रिक अस्वस्थ झाले होते. या लोकांच्या मार्फतच डॉ. दाभोलकरांची हत्या करण्यात आली. दाभोलकरांना संपवून हा कायदा कायमचा निकालात काढला जाईल असे या लोकांना वाटत असावे. परंतु दाभोलकरांच्या हत्येनंतर अंनिसचा आणि इतर सामाजिक चळवळीचा ही शासनावर दबाव वाढत गेला आणि नाईलाजाने या कायद्याचा शासनाकडून अध्यादेश काढण्यात आला. आज या अध्यादेशाचे रितसरपणे कायद्यात रूपांतर झालेले आहे. डॉ. नरेंद्र दाभोलकरांनी आपल्या अंनिसच्या कार्यकर्त्यासह अंधश्रध्दाविरूध्द, प्रतिगामी शक्तीविरोध, जातीव्यवस्थेविरूध्द व सामाजिक शोषणाविरूध्द उभारलेला लढा हा अद्वितीय स्वरूपाचा राहिलेला आहे. या लढ्यातून प्रतिगामी सनातनी शक्तीचे हितसंबंध आणि सर्वसामान्य जनतेचे हितसंबंध यातील अंतरविरोधाचा हा संघर्ष राहिलेला आहे. या संघर्षात सरळ सरळ राजकीय सत्ता प्राप्तीचे राजकारण नसले तरी व्यापक अर्थाने सर्वसामान्य शोषीत जनतेच्या हितसंबंधाचे सामाजिक राजकारण

समोर आल्याचे दिसून येते. दाभोलकरांची आणि त्यांच्या अंनिस चळवळींने समता, स्वातत्र्य, बंधुत्व, न्याय, धर्मनिरपेक्षता, लोकशाही, समाजवाद या मूल्याच्या प्रस्थापनेचे जातीअंताचे, वर्गअंताचे, स्त्रीदाश्यअंताचे सामाजिक शोषणमुक्तीचे अंधश्रध्दा निर्मूलनाचे सामाजिक राजकारण गतिमान केले, हे सामाजिक राजकारण महाराष्ट्रासाठी, देशासाठी आणि अशा समस्यांनी ग्रस्त असलेल्या जगासाठीही मार्गदर्शक, उपकारक ठरणारे आहे, म्हणून डॉ. दाभोलकरांचे आणि त्यांच्या चळवळीचे हे सामाजिक राजकारण अधोरेखित करण्याच्या दृष्टिने त्यांचे महत्त्व अधोरेखित करण्याच्या दृष्टिने संशोधन मार्गदर्शक डॉ. आदिनाथ इंगोले यांच्याशी विचार विनिमय व चर्चा करून प्रस्तूत संशोधन पी.एच.डी. पदवी करिता ''डॉ. नरेंद्र दाभोलकरांचे सामाजिक राजकारण : एक राजकीय अभ्यास'' या विषयाची निवड करण्यात आली आहे.

संशोधन समस्या (Problem of Research) :

डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचे महाराष्ट्रातील आणि देशातील अंधश्रध्दा निर्मूलनात, पुरोगामी विचार प्रबोधनात संविधानिक मूल्यांच्या प्रचार प्रसारात, स्त्रिया, दलित, शोषित बहुजन वर्गाच्या जाणीव जागृतीत फार मोठे मूलभूत स्वरूपाचे योगदान राहिले आहे. त्यांचे अंधश्रध्दा निर्मूलनाचे समाजकारण हे समाजातील बुवाबाबा, मांत्रिक तांत्रिक वगैरे भोंदूगिरी करणाऱ्यांच्या, देवाच्या व धर्माच्या आधाराने राजकारण करणाऱ्यांच्या हितसंबंधाविरूध्द असल्यामुळे अशा प्रतिगामी लोकांकडून दाभोलकरांच्या चळवळीला, कार्याला सातत्याने विरोध झालेला आहे. त्या विरोधीची पर्वा न करता ते कायमस्वरूपी अशा प्रतिगामी शक्तिविरूध्द सतत संघर्षरत राहिले. हे डॉ. नरेंद्र दाभोलकरांचे व्यापक अर्थाने सामाजिक राजकारणच होते.

डॉ. दाभोलकरांच्या या सामाजिक राजकारणाबद्दल किंवा त्यांच्या एकुणच कार्याबद्दल, चळवळीबद्दल सामाजिकशास्त्रात संशोधकांनी अद्याप गंभीरपणे कुणी दखल घेतलेली दिसून येत नाही.

डॉ. दाभोलकरांच्या विचाराची, चळवळीची व कार्याची गंभीरपणे दखल घेतली जावी आणि त्यांचे कार्य, त्यांचे सामाजिक राजकारण अधोरेखित करावे या दृष्टिने प्रस्तूत संशोधन प्रबंध पीएच.डी. पदवीकरिता घेतलेला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे (Objective of Research) :

१. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्यावरील गांधीवाद, आंबेडकरवाद व मार्क्सवाद यांच्या प्रभावाचा अभ्यास करणे.
२. डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या समाजवादी विचारसरणीचा अभ्यास करणे.
३. डॉ. नरेंद्र दाभोलकरांचा वैचारिक दृष्टिकोन विचार जाणून घेणे.
४. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी मांडलेली अंधश्रध्दा निर्मूलनाची संकल्पना समजून घेणे.
५. डॉ. नरेंद्र दाभोलकरांनी सामाजिक अंधश्रध्दा दूर करण्यासाठी केलेल्या सामाजिक राजकारणाचा अभ्यास करणे.
६. डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या समाजसुधारणांचा राजकीय प्रक्रियेवर पडलेल्या प्रभावाचा अभ्यास करणे.
७. डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या कार्यामुळे अंनिसच्या दबावामुळे शासनाला कोण कोणते निर्णय घ्यावे लागले? याचा अभ्यास करणे.
   उदा. : ''जादूटोणाविरोधी कायदा'' निर्मितीच्या कार्यासंदर्भात अभ्यास करणे.
८. महाराष्ट्रातील / भारतातील विद्यमान असलेल्या अंधश्रद्धा दूर करण्याकरिता नरेंद्र दाभोलकर यांच्या विचाराच्या उपयुक्ततेचा शोध घेणे.
९. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचे सामाजिक राजकारण व त्या समोरील आव्हाने स्पष्ट करणे (समजून घेणे)

गृहित कृत्ये / संशोधनाची गृहितके (Hypothesis) :

१. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी सामाजिक राजकारणाच्या माध्यमातून धर्म व्यवस्थेला अंधश्रध्दा व अनिष्ठ प्रथा या संदर्भाने लक्ष केले.
२. अंधश्रध्दा निर्मूलनासाठी, सामाजिक सुधारणेसाठी केल्या जाणाऱ्या सामाजिक राजकारणासमोर अनेक आव्हाने आहेत.
३. डॉ. दाभोलकरांचे विचार सामाजिक व अनेक धार्मिक अंधश्रध्दा अनिष्ठ रूढी, प्रथा परंपरा, चालिरिती नष्ट करण्यात इ. विचार उपयुक्त / महत्वपूर्ण आहे.
४. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या योगदानामुळे महाराष्ट्रात व पर्यायाने भारतात विज्ञानवादी विचारसरणीचा विकास झालेला आहे.
५. महाराष्ट्र शासनाने समाज सुधारणेसंबंधी अंधश्रद्धा निर्मूलनार्थक पुरोगामी कायदे कसे यामध्ये डॉ. दाभोलकरांचे मोठे योगदान आहे.
   उदा. : जादूटोणा विरोधी विधेयक

६. डॉ. दाभोलकर यांच्या योगदानामुळे श्रध्दा, अंधश्रद्धा, धर्म व मानवता अशा वैचारिक क्षेत्रात नव्या विज्ञानवादी विचारसरणीचा उदय, विकास झालेला आहे.
७. डॉ. दाभोलकरांनी, त्यांच्या चळवळीने पुरोगामी चळवळींना एकत्र आणण्याचे काम केले.

संशोधनाचे महत्त्व (Importance of Research) :

१. वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे तसेच धर्माबद्दल चिकित्सक दृष्टिकोन विकसीत करणे हे डॉ. दाभोलकर यांनी केलेले महान कार्य ते समजून घेण्याच्या दृष्टीने समकालीन धार्मिक, सामाजिक व्यवस्थेचा अभ्यास करण्याच्या दृष्टिने प्रस्तूत संशोधनविषय महत्वाचा आहे.
२. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या समाजकार्यामुळे महाराष्ट्र शासनाला ''जादूटोणाविरोधी कायदा'' राज्यशासनाला करणे भाग पडले.
३. समकालीन सामाजिक, धार्मिक व्यवस्थेत माणूस श्रध्दा, अंधश्रध्दा या बाबतीत वैचारिक द्वंदात अडकलेला आहे हे सोडविण्याच्या दृष्टीने या अभ्यासाचा उपयोग होईल.
४. समाजात भोंदूबाबा, मांत्रिक, धर्मपुरोहित यांच्याकडून सर्वसामान्य जनतेची फसवणूक होते अशा अंधश्रध्द व्यक्तीपासून मानवी समाजाला प्रकाशाचा मार्ग दाखविण्याच्या दृष्टिने अभ्यास / संशोधन करणे उपयुक्त ठरेल.
५. समाजातील विविध पंथ, संप्रदाय, धर्मगुरू यांचे धर्म विषयक अंधश्रध्द विचार व त्यांनी स्वार्थासाठी नागरिकांच्या धर्मभोळेपणाचा वापर करणे हे समजून घेऊन त्यावर उपाययोजना शोधण्याच्या दृष्टीने प्रस्तूत संशोधनाचा विषय महत्वाचा ठरतो.

संशोधन पध्दती (Research Method) :

प्रस्तूत संशोधनासाठी समाजशास्त्रीय संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात येईल. यामध्ये ऐतिहासिक, विश्लेषणात्मक, वर्णनात्मक, तुलनात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात येईल. व त्याचबरोबर व्यष्टी अध्ययन पध्दती (Case Study Method) ही अवलंब करण्यात येईल. प्रामुख्याने श्रध्दा, अंधश्रध्दा हा विषय लोकांच्या मानसिकतेशी संबंधित असल्यामुळे मानसशास्त्रीय संशोधन पध्दतीचाही यात अवलंब केला जाईल.

प्रस्तूत विषय समाजशास्त्र व राज्यशास्त्र यांच्याशी संबंधित असल्यामुळे यात सामाजिक – राजकीय संशोधन पध्दतीचाही अवलंब केला जाईल.

तथ्य संकलन पध्दती (Data Collection Method) :

प्रस्तूत संशोधन पूर्ण करण्यासाठी दोन प्रकारच्या साधन सामुग्रीचा अवलंब केला जाईल.

अ) प्राथमिक तथ्य (Primary Data) :

प्राथमिक तथ्य संकलनासाठी डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचे ग्रंथ, त्यांनी लिहिलेली लेख, त्यांची पत्रके आणि त्यांनी चळवळीच्या संदर्भाने लिहिलेले पत्रे तसेच मग डॉ. दाभोळकर यांचे भाषणे त्यांच्या उपलब्ध मुलाखतीच्या दृक–श्राव्य साधणाचा वापर करण्यात येईल.

ब) द्वितीयक तथ्य (Secondary Data) :

संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रे, मासिके, लोकराज्य, त्रैमासिके, साप्तहिके, नियतकालिके इ. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या कार्यासंबंधी इतरांनी केलेले लिखाण दाबोळकरांच्या कार्यासाठी इतरांनी केलेले लिखाण यातून माहिती संकलीत तसेच संगणकावरील विविध त्यांच्या चळवळी विषयी लेखण केलेले त्यांचे व्दितीय तथ्य वापरण्यात येईल.

संशोधन आराखडा (Research Design) :

प्रकरण १. प्रस्तावना : संशोधन विषय व संशोधन पध्दती

प्रस्तूत प्रकरणात संशोधन विषयाची प्राथमिक रूपरेखा, संशोधन समस्या, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहितके, संशोधनाचे महत्त्व, संशोधन पध्दती, तथ्य संकलनाची साधने व प्रकरण नियोजना इ. घटकाची चर्चा करण्यात येईल.

प्रकरण २. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची बौध्दिक जडण–घडण :

या प्रकरणात डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या कुटुंबाची पार्श्वभूमी, त्यांचे बालपण, त्यांचे शिक्षण, त्यांच्या व्यक्तीमत्व विकास आणि त्यांच्या वैचारीक जडण–घडणीवर विविध विचारवंताचा प्रभाव, त्यांची बौध्दीक जडण–घडण आणि

यातून त्यांनी केलेले सामाजिक, राजकीय कार्य आदि संदर्भाने त्यांच्या जिवन चरित्राची सखोल प्रस्तुत प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण ३. अंधश्रध्दा निर्मूलन चळवळीतील मूलभूत योगदान :

प्रस्तूत प्रकरणात दाभोलकर यांनी ''अंनिस'' ची स्थापना कधी व का केली? अंनिसच्या अगोदर त्यांचा विविध आंदोलनात व चळवळीच्या माध्यमातून महाराष्ट्रात कोण कोणते समाजसुधारणेसाठी कार्य केले आहे. तसेच महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन चळवळीची स्थापना व विस्तार, विकासातील योगदान यांचा प्रस्तूत प्रकरणात अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण ४. डॉ. नरेंद्र दाभोलकरांचे सामाजिक आणि राजकीय विचार :

प्रस्तूत प्रकरणात डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची विचारसरणी आणि त्यांच्या सामाजिक आणि राजकीय विचारात धर्मनिरपेक्षता, लोकशाही, समाजवाद इ. बाबींचा चिकित्सक दृष्टिकोनातून अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण ५. डॉ. नरेंद्र दाभोलकरांचे सामाजिक राजकारण :

प्रस्तूत प्रकरणात डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी समाजसुधारणा करण्यासाठी केलेला श्रध्दा, अंधश्रध्दा, रूढी प्रथा परंपरा याविरूध्द त्यांनी तात्त्विक व व्यावहारिक पातळीवर दिलेला लढा, बाबींचा अभ्यास सामाजिक राजकारण या प्रकरणात येईल. त्याचबरोबर त्यांनी महाराष्ट्रामध्ये सामाजिक राजकारण कशा पध्दतीने केलेले आहे याचे विस्तृत विवेचन करण्यात येईल.

प्रकरण ६. निष्कर्ष (Conclusion) :

प्रस्तूत प्रबंधाच्या शेवटच्या प्रकरणात एकूण अभ्यासातून निष्पन्न झालेले निष्कर्ष नोंदविण्यात येतील. तसेच दाभोलकरांच्या विचारातून त्यांनी निश्चित केलेली अंधश्रध्दामुक्त, आदर्श समाजाचे ध्येय साध्य करण्यासाठीच्या ठोस उपाय योजना सुचविण्यात येतील.

संदर्भ ग्रंथ सूची (Bibliography) :

१. डॉ. नरेंद्र दाभोलकर, २०१४, तिमिरातुनी तेजाकडें, राजहंस प्रकाशन, पुणे ४११०३०.

२. डॉ. नरेंद्र दाभोलकर, वैज्ञानिक दृष्टीकोन
३. डॉ. नरेंद्र दाभोलकर, श्रध्दा—अंधश्रध्दा, राजहंस प्रकाशन, पुणे ४११०३०.
४. डॉ. नरेंद्र दाभोलकर, अंधश्रध्दा विनाशाय, राजहंस प्रकाशन, पुणे ४११०३०.
५. डॉ. नरेंद्र दाभोलकर, लढे अंधश्रध्देचे, राजहंस प्रकाशन, पुणे ४११०३०
६. डॉ. नरेंद्र दाभोलकर, विचार तर कराल? राजहंस प्रकाशन, पुणे—४११०३०.
७. डॉ. नरेंद्र दाभोलकर, अंधश्रध्दा प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम राजहंस प्रकाशन, पुणे — ४११०३०.
८. डॉ. नरेंद्र दाभोलकर, भ्रम आणि निरास, राजहंस प्रकाशन, पुणे — ४११०३०.
९. डॉ. नरेंद्र दाभोलकर, विनोद शिरसाठ, तत्त्वप्रणाली व अंमलबजावणी, साधना प्रकाशन, पुणे.
१०. डॉ. नरेंद्र दाभोलकर, पा.न. निपाणीकर व प्रा. मच्छिंद्रनाथ मुंडे, द्वितीय आवृत्ती (फेब्रु. १९९३), महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती प्रकाशक, सदाशिव पेठ, सातारा ४१५००२.
११. प्रा. नागोराव कुंभार (संपादक), विचारशलाक (जोड अंक), प्रबोधन प्रकाशन, लातूर.
१२. तुकाराम जाधव (संपादक), महाराष्ट्र वार्षिकी (२०१४), युनिक ॲकॅडमी, पुणे— ४११००४.
१३. निर्मूलकुमार सुर्यवंशी, भारतीय संविधानाचे अंतरंग
१४. सुहास पळशीकर, Superstition slayer
१५. www. antisuperstition.org

मासिक, त्रैमासिक, वार्षीक विशेषांक :—

१. Thought Action, (त्रैमासिक)
२. डॉ. नरेंद्र दाभोलकर विशेषांक, अंधश्रध्दा निर्मूलन वार्तापत्र, (सप्टे. ऑक्टो. २०१३)
३. डॉ. नरेंद्र दाभोलकर विशेषांक, अंधश्रध्दा निर्मूलन वार्तापत्र, (२०१४)

- **वृत्तपत्रे :—**

१. दैनिक लोकमत,

१) मुक्ता दाभोलकर, विवेक जागवा, ४ जाने. २०१५, लोकमत भवन, जालना रोड, औरंगाबाद.

२) ॲड. निर्मूलकुमार सूर्यवंशी, कायदा झाला, तर त्रुटी आहेतच, ४ जाने. २०१५.

३) गोविंद पानसरे, प्रबोधनाची भयानक कमतरता, ४ जाने. २०१५.

४) डॉ. प्रदीप पाटकर, मानसिकता बदला, ४ जाने. २०१५.

५) कृष्ण चांदगुडे, पंडितामध्ये स्त्रियांच जास्त, ४ जाने. २०१५.

२. द टाईम्स ऑफ इंडिया न्यूज पेपर, २१ ऑगस्ट २०१३, स्वैर भाषांतर, महेश शिरापूरकर.

३. वृत्तरत्न सम्राट, न्यूज पेपर, संपादकीय पान, २६ डिसें. २०१४

४. दैनिक पुण्यनगरी अभय अरविंद, अंधश्रध्दा : मांत्रिकांच्या नंगानाच, ४ जाने. २०१४, पेज न.

संशोधक

धुळेकर नागनाथ यादवराव
मु. पो. कोल्हेबोरगाव
ता. बिलोली जि. नांदेड.

मार्गदर्शक

प्रा.डॉ.आदिनाथ इंगोले
सहयोगी प्राध्यापक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख
संशोधन मार्गदर्शक,
श्री गुरूबुध्दी स्वामी महाविद्यालय पूर्णा,
जि.परभणी